शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना या संस्थेत शिक्षक व शिक्षकेतर पदे टप्प्या-टप्प्याने निर्माण करण्यास मंजूरी देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- टिईडी -२००९/(४५/०९)/तांशि-५**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.**
**दिनांक :- २४ ऑगस्ट, २००९**

संदर्भ :- १. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. ९(३)/नतंनि पद/अंबड/२००८-०९/१०९४, दि. १४/११/२००८.
२.अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषदेचे पत्र क्र. एफ २२-२९९६/२००९ (डिप्लो. इंजि.), दि.२९.६.२००९ व दि.३०.६.२००९ (सुधारीत आदेश)
३. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता-२००९/ (३०४/०९) / तांशि-५, दि.३० जून २००९
४. संयुक्त सचिव समितीच्या दि. ३ जुलै २००९ रोजी झालेल्या बैठकीचे कार्यवृत्त क्र. वित्त विभाग, संयुक्त-१००९/इतिवृत्त/प्र.क्र.६३/२००९/वित्तीय सुधारणा-१, दि. १४ जूलै २००९

**प्रस्तावना** :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, विभागीय कार्यालय, मुंबई यांच्या संदर्भ-२ मधिल पत्रान्वये शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना येथे खालील पदवीका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने संदर्भ- ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १ | मेकॅनिकल इंजिनिअरींग | ६० |
| २ | इलेकट्रॉनिक्स इंजिनियरींग | ६० |
| ३ | कॉम्प्युटर इंजिनिअरींग | ६० |
| ४ | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | ६० |
| | एकूण | २४० |

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या मानके व प्रमाणकानुसार शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना या नवनिर्मित शासकीय तंत्र निकेतनाकरीता आवश्यक शिक्षकीय व शिक्षकेतर पदे निर्माण करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधिन होता.

**शासन निर्णय :-** उपरोक्त संदर्भ- १ मध्ये नमूद केलेल्या पत्रान्वये शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना या - नवनिर्मित शासकीय तंत्र निकेतनाकरीता आवश्यक शिक्षकीय व शिक्षकेतर पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव संयुक्त सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. उपरोक्त संदर्भ-४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे संयुक्त सचिव समितीच्या दि. ३ जूलै, २००९ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.. संयुक्त सचिव समितीच्या सदर बैठकींनंतर उच्चस्तर सचिव समितीची पुढील बैठक त्वरीत होणार नसल्याने व अंबड जि. जालना येथील शासकीय तंत्रनिकेतन सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार असल्याने या संस्थेतील प्रस्तावित पदनिर्मिती तत्पूर्वी होणे आवश्यक असल्याची बाब विचारात घेऊन, संयुक्त सचिव समितीचा अहवाल उच्चस्तर सचिव समितीसमोर न ठेवता त्यास थेट मा. मुख्य सचिवांची मान्यता घेण्यात आली. सदर मान्यतेनुसार या संस्थेत सोबत जोडलेल्या विवरणपत्र अ व ब मध्ये नमूद केल्याप्रमाणे ४८ शिक्षकीय व ३९ शिक्षकेतर अशी एकूण ८७ पदे शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून टप्प्या-टप्प्याने निर्माण करण्यास निम्न अटींच्या अधिन राहून शासन याद्वारे मान्यता देत आहे.

१) संस्थेतील विजतंत्री (१पद), कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर (१ पद) व डाटा एन्ट्री ऑपरेटर (१ पद) अशी तीन तांत्रिक सहाय्यकारी पदे कायम स्वरुपी कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावी. सदर पदावर नियमित नियुक्ती करण्यात येऊ नये.

२) नवनिर्मित पदावरील ५ वर्षानंतरच्या वेतनावरील खर्च योजनेत्तर करुन घेण्याकरीता स्वतंत्र प्रस्ताव संचालक, तंत्र शिक्षण यांनी विहीत वेळेत शासनास सादर करावा अन्यथा सदरहू पदे त्या पुढे चालू ठेवण्यात येणार नाहीत.

३) मान्यता प्राप्त शिक्षकीय पदांवर आवश्यक नियुक्त्या झाल्यावरच शिक्षकेतर पदे भरण्यात यावी.

४) संस्थेसाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था, बागकाम व सफाईचे कामे निविदा मागवून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार बाहयश्रोत्यांकडून करुन घेण्यात यावे. सदर कामकाजासाठी संस्थेत पदनिर्मिती करण्यात येणार नाही.

२. सदरचा शासन निर्णय उपरोक्त संदर्भ - ४ मधील संयुक्त सचिव समितीच्या तथा अनौपचारिक संदर्भ क्र. सीएसओ / दिनांक ६.८.२००९ अन्वये उच्चस्तर समितीच्या मान्यतेने तसेच शासन निर्णय क्रमांक प्रदेश -१००५/१६३/०५/तांशि-२ दिनांक-४/८/०९ अन्वये उच्च व तंत्रशिक्षण विभागास देण्यात आलेल्या सवलतीचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

३. उपरोक्त बाबींवरील होणारा खर्च तूर्तास प्रधान लेखाशिर्ष क्रमांक डब्लु-३, २२०३-तंत्रशिक्षण-१०५, तंत्रनिकेतने - पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - १०५ (००) (०२) शासकीय तंत्र निकेतनांचा विस्तार व विकास (२२०३ ०२ ११) या लेखा शिर्षाखाली वित्तीय वर्ष २००९-१० करिता व तद्नंतर वेळोवेळी सदर लेखा शिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या / येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश शासनाच्या संकेतस्थळ वर "www.maharashtra.govt.in" वर ठेवण्यात आला असून त्यांचा संगणक सांकेतांक. २००९ ०७० ९१३१९२६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सोबत : विवरणपत्र : अ व ब

(व्यं. ह. कुलकर्णी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००१.
२. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (पुणे).
३. प्राचार्य, शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र १, मुंबई,
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
६. जिल्हा कोषागार अधिकारी. जालना
७. नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
८. निवड नस्ती / तांशि ५.

TRUE COPY
Lecturer in ...
Govt. Polytechnic
...bad

D:\MY DOCUMENT\Ambad\G.R.doc
एच-१६५४ -१३

शा.नि.उ व तं.शि क्रमांक टिईडी-२००९//(४५/०९)/तांशि-५, दि. २४/८/०९ सोबतचे विवरण पत्र

विवरणपत्र - अ

शासकीय तंत्रनिकेतन, अंबड जि. जालना या संस्थेसाठी मंजूर शिक्षकीय पदे

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सन २००९-१० ते २०११-१२ या कालावधीत निर्माण करावयाची एकत्रित पदसंख्या | सदर शासन निर्णयाच्या दिनांकास अस्तित्वात येणारी पदे | जून २०१० पासून अस्तित्वात येणारी पदे | जून २०११ पासून अस्तित्वात येणारी पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | १६४००-२००००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| २ | विभागप्रमुख | १२०००-१८३००/- | ४ (चार) | ० | ३ (तीन) | १ (एक) |
| ३ | प्रशिक्षण व आस्थापना अधिकारी | १२०००-१८३००/- | १ (एक) | ० | ० | १ (एक) |
| ४ | अधिव्याख्याता | ८०००-१३५००/- | ४०(चाळीस) | १८(अठरा) | ११(अकरा) | ११(अकरा) |
| ५ | प्रणाली विश्लेषक | ८०००-१३५००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| ६ | कर्मशाळा अधिक्षक | ८०००-१३५००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| | | एकूण | ४८(अठ्ठेचाळीस) | २१(एकवीस) | १४(चौदा) | १३(तेरा) |



D:\MY DOCUMENT\Ambad\G.R.doc
एच-१६५४ -२

① 24 June 09 } 06 01 3/2.9.1
② 19-10-2010 4 02 Bm }

शा.नि.उ व तं.शि क्रमांक टिईडी-२००९//(४५/०९)/तांशि-५, दि. २४/८/०९ सोबतचे विवरण पत्र

विवरणपत्र - ब

शासकीय तंत्र निकेतन, अंबड, जि. जालना या संस्थेसाठी मंजूर शिक्षकेतर पदे

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | सन २००९-१० ते २०१२-१३ या कालावधीत निर्माण करावयाची एकत्रित पदसंख्या | सदर शासन निर्णयाच्या दिनांकास अस्तित्वैत येणारी पदे | जून २०१० पासून अस्तित्वैत येणारी पदे | जून २०११ पासून अस्तित्वैत येणारी प्रदे |
|---|---|---|---|---|---|---|
| **अ. प्रशासकीय पदे** | | | | | | |
| १ | प्रबंधक | ६५००-१०५००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| ४ | वरिष्ठ लिपिक | ४०००-६०००/- | २(दोन) | १ (एक) | १ (एक) | ० |
| ६ | भांडारपाल | ४५००-७०००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| ७ | कनिष्ठ लिपिक | ३०५०-४५९०/- | ६(सहा) | २ (दोन) | २ (दोन) | २ (दोन) |
| ८ | शिपाई | २५५०-३२००/- | ६(सहा) | ३ (तीन) | २ (दोन) | १ (एक) |
| **ब. तांत्रिक सहाय्यकारी पदे** | | | | | | |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक (तांत्रिक) | ४०००-६०००/- | १०(दहा) | ५(पाच) | ३ (तीन) | २ (दोन) |
| ४ | प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) | ३२००-४९००/- | २ (दोन) | १ (एक) | १ (एक) | ० |
| ५ | विजतंत्री (कंत्राटी पध्दती) | ४०००-६०००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| ८ | कॉम्प्यूटर प्रोग्रॅमर (कंत्राटी पध्दती) | ५५००-९०००/- | १ (एक) | १ (एक) | १ | ० |
| ९ | डाटा एन्ट्री ऑपरेटर (कंत्राटी पध्दती) | ५०००-८०००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| १० | कर्मशाळा परिचर | २५५०-३२०० | ६(सहा) | ३ (तीन) | २ (दोन) | १ (एक) |
| **क. ग्रंथालय कर्मचारी पदे** | | | | | | |
| १ | ग्रंथपाल | ८०००-१३५००/- | १ (एक) | १ (एक) | ० | ० |
| ४ | ग्रंथालय शिपाई | २५५०-३२००/- | १(एक) | १ (एक) | ० | ० |
| | | एकूण | ३९ (एकोणचाळीस) | २२ (बावीस) | ११ (अकरा) | ६ (सहा) |

----------